# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

सिंचन भवन, बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे-४११ ०११


## नियामक मंडळाची ४१ वी बैठक दि.११ ऑगस्ट २००४.

## ठराव

मा.ना.अजित पवार, मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे) ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ४१ वी बैठक दि.११.८.२००४ रोजी मा.मंत्रीमहोदयांचे कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

**ठराव क्र. ४१/१**

''ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ४० व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत.''

**ठराव क्र.४१/२**

"ठराव करण्यांत येतो की,

अ. महामंडळ कार्यालयात मुख्य अभियंता (महामंडळ) हे पद पुन्हा कार्यरत झाल्याने मुख्य अभियंता (महामंडळ) यांची निविदा समिती व क्लेम समिती यामध्ये समिती सदस्य म्हणून समावेश करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच दोन्ही प्रादेशिक मुख्य अभियंता (मुख्य अभियंता (पा) पुणे व मुख्य अभियंता (विप्र) पुणे यांचीही निविदा समिती व क्लेम समिती यामध्ये सदस्य म्हणून समावेश करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

ब. निविदा समिती व क्लेम समिती यांचे समोर ज्या पाटबंधारे प्रकल्पाबाबतचे प्रकरण विचारार्थ असेल, त्या प्रकल्प मंडळाचे अधीक्षक अभियंता यांची निविदा समितीचे/ क्लेम समितीचे सदस्य म्हणून समावेश करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.

क. कंत्राट विषयक मागण्या/क्लेम्स बाबत लवाद निर्णय/कोर्टाचे निर्णय यावर प्रकरणांची तांत्रिक/आर्थिक तपासणी करुन वित्त सदस्य/मुख्य लेखा व वित्त अधिकारी व कार्यकारी संचालक यांचे अभिप्रायानंतर मा. अध्यक्ष (म.कृ.खो.वि.म.) यांचे मान्यतेने त्या प्रकरणी अंतिम निर्णय घेण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

मा.मंत्री, पा. (कृखो व कोपाविम)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म.पुणे

*Dir_meet_copy*

वरील बदलानुसार याप्रमाणे करावयाची कार्यवाही, ही क्लेम समितीकडे यापूर्वीच लवाद निर्णय/ कोर्टाचे निर्णय या विषयीची काही प्रकरणे विचारार्थ सादर केली असतील, त्यांचे बाबतीतही लागू राहील. "

वरील सर्व निर्णयांच्या अनुषंगाने निविदा समिती व क्लेम समितीची रचना व कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

निविदा समिती

| निविदा समितीची रचना | पदनाम | वित्तीय अधिकार |
|---|---|---|
| सचिव (पा) व सदस्य | समिती प्रमुख | (१) १० टक्के पेक्षा जास्त अधिक्य असलेल्या निविदा एकमताने मंजूर करणे. (२) रु. १५ लक्ष व रु. ५० लक्ष पर्यंतच्याकंत्राटदारांच्या मागण्या/ क्लेम्स एकमताने मंजूर करणे. (३)वरील अधिकार मा.मंत्री (पा),व अध्यक्ष, (मकृखोविम) यांच्या मंजूरीच्या अधीन राहतील. |
| सचिव (लाक्षेवि) व सदस्य | समिती सदस्य | |
| सचिव (सा.बां.)महा.शासन | समिती सदस्य | |
| वित्त सदस्य (महामंडळ) | समिती सदस्य | |
| कार्यकारी संचालक (महामंडळ) | समिती सदस्य | |
| मुख्य अभियंता (महामंडळ) | समिती सदस्य | |
| मुख्य अभियंता (पा)/मुख्य अभियंता (विप्र) | समिती सदस्य | |
| आंतरवित्त सल्लागार (पावि) | समिती सदस्य | |
| अधीक्षक अभियंता (महामंडळ) | सदस्य सचिव | |
| संबंधित प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता | समिती सदस्य | |

क्लेम्स समिती

| क्लेम्स समितीची रचना | पदनाम | वित्तीय अधिकार |
|---|---|---|
| सचिव (पा) व सदस्य | समिती प्रमुख | (१)रु.५०लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या कंत्राटदारांच्या मागण्या, दावे, क्लेम्स एकमताने मंजूर करणे (२)हे अधिकार मा. मंत्री(पा)व अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या मंजूरीच्या अधीन राहतील. |
| सचिव (लाक्षेवि) व सदस्य | समिती सदस्य | |
| सचिव (सा.बां.)महाराष्ट्र शासन | समिती सदस्य | |
| वित्त सदस्य (महामंडळ) | समिती सदस्य | |
| कार्यकारी संचालक (महामंडळ) | समिती सदस्य | |
| मुख्य अभियंता (महामंडळ) | समिती सदस्य | |
| मुख्य अभियंता (पा)/मुख्य अभियंता (विप्र) | समिती सदस्य | |
| महामंडळाचे कायदे सल्लागार | समिती सदस्य | |
| आंतरवित्त सल्लागार (पावि) | समिती सदस्य | |
| अधीक्षक अभियंता (महामंडळ) | सदस्य सचिव | |
| संबंधित प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता | समिती सदस्य | |

मा.मंत्री, पा. (कृखो व कोपाविम)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म.पुणे

Dir_meet_copy

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

सिंचन भवन, बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे-४११ ०११


ठराव क्र. ४१/३

ठराव करण्यांत येतो की, महामंडळांतर्गत चालू असलेल्या १२ महिने व त्यापेक्षा कमी कालावधीच्या निविदांना भाववाढ देण्याचा प्रस्ताव सद्यःस्थितीत अमान्य करण्यात येत आहे.

ठराव क्र.४१/४

ठराव करण्यांत येतो की, "पवना प्रकल्पासाठी सन १९६३-६४ मध्ये बांधलेल्या वसाहतीतील, २०० निवासस्थानापैकी १५७ निवासस्थाने, पवना रहिवाशी सेवा संघाने ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टा कराराने मागणी केलेली आहे.

१. पवना रहिवाशी सेवा संघ यांना पवनानगर वसाहतीमधील १५७ निवासस्थानाची पाणीपट्टी, लाईट बिल, देखभाल दुरुस्ती खर्च व इतर असणारे कर भरावे लागतील.

२. तसेच पवना रहिवाशी संघाने २ वर्षाची बँक गॅरंटी महामंडळास सादर करावी व दर दोन वर्षांनी त्या बँक गॅरंटीचे नुतनीकरण करावे लागेल व

३. निव्वळ १५७ निवासस्थानाच्या वार्षिक भाड्यापोटी रु.२,६७,७३३/- (रुपये दोन लक्ष सदुसष्ट हजार सातशे तेहतीस फक्त) प्रतिवर्षी भाडे दरामध्ये १० टक्के वाढ द्यावी लागेल

वरील ३ अटीच्या अधिन राहून ३० वर्षाच्या कालावधीसाठी सदर जागा भाडे पट्टा करारावर देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

ठराव क्र. ४१/५

''ठराव करण्यांत येतो की, भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून श्री क्षेत्र आळंदी, (५०३.०८ हेक्टर ),मौजे चऱ्होली खूर्द (३६०.४३ हेक्टर ) धानोरे (३९०.०५ हेक्टर ) व सोलू (१२४.५१ हेक्टर ) या स्लॅबमुक्त करावयाचे, चार गावांचे संपूर्ण लाभक्षेत्र सुमारे १३७८.०७ हेक्टर वगळण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.''

ठराव क्र.४१/६

''ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ मालिका १, २ व ३ चे रजिस्ट्रार्स मे. किर्लोस्कर कॉम्प्युटर सर्व्हिसेस लि., बंगलोर यांचेशी झालेल्या सामंजस्य कराराची मुदत संपलेली असल्याने व त्यांची महामंडळाला दिलेली सेवा अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याने त्यांची सेवा समाप्त करण्यास तसेच त्याऐवजी नवीन रजिस्ट्रार नेमण्याचे अधिकार महामंडळाच्या कार्यकारी संचालक यांना मा.अध्यक्षांच्या मान्यतेने देण्यात येत आहेत.

मा.मंत्री, पा. (कृखो व कोपाविम)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म.पुणे

**ठराव क्र.४१/७**

ठराव करण्यांत येतो की,श्री स्वामी समर्थ ग्रामविकास प्रतिष्ठान,श्रीगोंदा, जि.अहमदनगर,या संस्थेस ११ महिन्यांच्या भाडेपट्टा करारावर देण्यांत आलेली महामंडळाच्या वापरात नसलेली रिकामी जागा व इमारत ३० वर्षांच्या कराराने महामंडळाच्या प्रचलित दराने,भाडेपट्ट्याने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.

**ठराव क्र.४१/८**

ठराव करण्यांत येतो की,नीरा डावा कालवा कि.मी.७८ मधील खालील प्रमाणे मोकळी जागा बारामती नगर परिषद,बारामती,जि.पुणे यांना ३० वर्षांच्या कराराने महामंडळाच्या प्रचलित दराने, भाडेपट्ट्याने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.

(अ) जळोची गट नं.१०५ लगत नीरा डावा कालवा कि.मी.७८ मधील स्विमिंग टॅन्कला लागून असलेली २००० चौ.मी.मोकळी जागा.

(ब) स.न.२६१ लगत नीरा डावा कालवा कि.मी.७८ मधील पुलाजवळील ३५६३ चौ.मी. मोकळी जागा.

**ठराव क्र.४१/९**

ठराव करण्यात येतो की, नीरा डावा कालवा कि.मी.क्र.७८ मधील बारामती जि.पुणे येथील स.नं.२७० लगतच्या जागेची महामंडळास आवश्यकता नसल्याने जेष्ठ नागरिक संघ, बारामती यांना तेथील सुमारे ५०० चौ.मी.क्षेत्र ३० वर्षाच्या कराराने रु.१०१/- प्रति महिना या नाममात्र भाडेपट्याने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्र.४१/१०**

ठराव करण्यात येतो की, नीरा डावा कालवा कि.मी.क्र.७८ मधील बारामती जि.पुणे येथील स.नं.२७० लगतच्या जागेची महामंडळास आवश्यकता नसल्याने व भारतीय खेळास प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण असल्याने बारामती तालुका कुस्तीगीर परिषद, बारामती यांना तेथील सुमारे ६०० चौ.मी.क्षेत्र ३० वर्षाच्या कराराने रु.१०१/- प्रति महिना या नाममात्र भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्र. ४१/११**

ठराव करण्यांत येतो की,महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने उभ्या केलेल्या खालील कर्जास/अधिकर्षास शासन हमी देणे विषयी शासनास विनंती करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे. कर्ज/अधिकर्षाचा तपशिल खालील प्रमाणे.

मा.मंत्री, पा. (कृखो व कोपाविम)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म.पुणे

*Dir_meet_copy*

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

सिंचन भवन, बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे-४११ ०११

| अ.क्र | तपशिल | देणे असलेली रक्कम (रु.कोटी) |
|---|---|---|
| १ | इतर महामंडळे | ५१.३५ |
| २ | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई | २५५.०० |
| ३ | बँकांचे अधिकर्ष | १८१.३४ |
| | एकूण | ४८७.६९ |

ठराव क्र.४१/१२

ठराव करण्यात येतो की, न्यु एशियन कन्स्ट्रक्शन कंपनी, मुंबई यांना त्यांची प्रलंबित असलेली रक्कम रु.८४.०० लक्षची देयके शासनाकडून हमी प्राप्त झाल्यानंतर युनायटेड वेस्टर्न बँक पुणे यांचेकडून अधिकर्ष (ओव्हरड्राफ्ट) घेऊन अदा करण्यास संमती देण्यात येत आहे.

ठराव क्र.४१/१३

ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळामधील ठेकेदारांची प्रलंबित अलेली देयके अनामत ठेवीमध्ये वर्ग करण्यास व त्या अनुषंगाने बँक हमी (Bank Guarantee) परत करण्यासाठी ठेकेदारांनी लेखी विनंती केल्यास ती परत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र ही सुविधा निविदामधील अटींशी सुसंगत नसेल तर लागु होणार नाही.

ठराव क्र.४१/१४

ठराव करण्यात येतो की, निविदांवरील कामे Defect liability period पुढेही काही लक्षणीय कालावधीपर्यंत सुस्थितीत राहण्यासाठी कंत्राटदारांना बंधनकारक करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर निविदा शर्तीमध्ये योग्य त्या सुधारणा करण्याबाबत नियामक मंडळ शासनास विनंती करीत आहे. याबाबत महामंडळामार्फत शासनास विनंती करण्याविषयी तसेच राज्यातील अन्य पाटबंधारे महामंडळांना अशा प्रकारे शासनास विनंती करणेसाठी, कळविणेसाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

ठराव क्र. ४१/१५

"ठराव करण्यांत येतो की, उत्तरमांड मध्यम प्रकल्पाच्या श्री. एल. बी. कुंजीर, ठेकेदार यांच्या निविदा क्र. ब-१/२४ सन १९९७-९८ या निविदेवरील काम बंद कालावधीतील रु. ९.९९ कोटी इतक्या किंमतीचा नुकसानभरपाईचा प्रस्ताव महामंडळास सादर झाला आहे. या नुकसान भरपाईच्या प्रस्तावापैकी स्विकृती निविदा शर्त क्र. ३४ अनुसार कंत्राटदारास अनुज्ञेय होणाऱ्या रु. ५.१७ कोटी इतक्या किंमतीच्या नुकसान भरपाई प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे. या विषयीची आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही मा. अध्यक्ष यांच्या सहमतीने करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यांत येत आहेत."

मा.मंत्री, पा. (कृखो व कोपाविम)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म.पुणे